# जाहीर निवेदन

तलाठी भरती परीक्षा २०२३ दिनांक २१/०८/२०२३ रोजी राज्यातील ३० जिल्हे व ११५ टीसीएस केंद्रावरती नियोजीत करणेत आली होती. सदर परिक्षेच्या वेळापत्रकानुसार सकाळी पहिले सत्र ९.०० ते ११.०० नियोजीत करणेत आले होते. तथापी टीसीएस कंपनीच्या डेटा सेंटर सर्व्हर मध्ये तांत्रिक बिघाड झालेने सदरचे सत्र वेळेनुसार सुरु करणेस अडचण निर्माण झाली. यासंदर्भात टीसीएस कंपनीकडून राज्य समन्वय कार्यालयास परिक्षा उशीरा सुरु होणेबाबत कळविण्यात आले. टीसीएस कंपनी व त्यांचे डेटा सेंटर यांनी सर्व देशभरातील परिक्षासंदर्भातील हा तांत्रिक बिघाड झाला असल्याने वरिष्ठ वैज्ञानिक यांच्या स्तरावर याबाबत युध्द पातळीवर हा तांत्रिक बिघाड शोधून परिक्षा ११.०० वाजता सर्व केंद्रवार सुरु करणेबाबत कळविणेत आले. राज्य समन्वयक यांनी सर्व निवासी उप जिल्हाधिकारी यांचेशी संपर्क करुन प्रथम सत्रातील विद्यार्थ्यांना नियोजीत परिक्षा उशीरा सुरु होईल असे कळविणेत आले. त्याप्रमाणे सर्व परिक्षाकेंद्रांवरील परिक्षार्थीना याची सुचना देण्यात आली.

टीसीएस कंपनीकडून तांत्रिक बिघाड दूर करणेत येवून राज्यातील सर्व ११५ केंद्रावर परिक्षा सुरु करणेबाबत सुचना मिळाल्यानंतर सर्व परिक्षा केंद्रातील अधिकाऱ्यांना याबाबत सुचित करणेत येवून परिक्षेसाठी आलेल्या विद्यार्थ्यांना परिक्षा केंद्रात प्रवेश देण्यात आला असून राज्यातील सर्व ११५ केंद्रावर ११.०० वाजता परिक्षा सुरु करणेत आली आहे.

राज्यातील सर्व तलाठी भरतीसाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांना टीसीएस कंपनीच्या तांत्रिक बिघाडामुळे आज होणाऱ्या तीनही सत्रातील परिक्षा नियोजीत वेळेपेक्षा दोन तास उशिरा सुरु होतील.त्याप्रमाणे बदलेल्या वेळेबाबत सर्व परिक्षा केंद्रावर सुचना प्रसारित करणेची कार्यवाही निवासी उपजिल्हाधिकारी यांचे मार्फत परिक्षा केंद्राना देण्यात येत आहे. तरी सर्व परिक्षार्थी विद्यार्थ्यांनी महसूल प्रशासन / पोलीस प्रशासन तसेच टीसीएस कर्मचारी यांना सहकार्य करावे ही विनंती. सर्व परिक्षार्थीना नियोजीत दोन तासांचा वेळ परिक्षेसाठी देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे दिव्यांग परिक्षार्थी यांना आजचे सत्र दोन मध्ये अतिरिक्त देय असणारा वेळ देण्यात येणार आहे. आपणास या निवेदनाद्वारे आज टीसीएस कंपनी व त्यांचे डेटा सेंटर यांचे कडून तांत्रिक बिघाडामुळे झालेल्या दिरंगाई व मनस्तापाबद्दल शासनाच्या वतीने राज्य समन्वयक तलाठी भरती परिक्षा २०२३,यानिवेदनाद्वारे दिलगीरी व्यक्त करीत आहे. कृपया सर्वांनी सहकार्य करावे ही नम्र विनंती.

आपला विश्वासू

xxx/-

(आनंद रायते) भा.प्र.से.
राज्य परिक्षा समन्वयक तलाठी भरती परिक्षा-२०२३
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख पुणे